# घटक: आणिबाणी विषयक तरतुदी

भाग १८- कलम ३५२ ते ३६०

आणीबाणीच्या वेळी सर्व अधिकार केंद्र सरकारकडे - राज्ये केंद्राच्या नियंत्रणाखाली.

## ① राष्ट्रीय आणीबाणी

युद्ध किंवा परकीय आक्रमण किंवा सशस्त्र उठाव (हा शब्द ४४व्या घ.दु.ने १९७८ मध्ये - 'अंतर्गत अशांतता या शब्दाच्या जागी) यामुळे भारताच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या सुरक्षिततेला धोका उत्पन्न होतो त्यावेळी कलम ३५२ अनुसार राष्ट्रपती आणीबाणी घोषित करू शकतो.
अशी परिस्थिती प्रत्यक्ष उद्भवली नसताना तशी शक्यता असल्यास देखील आणिबाणी घोषित केली जाऊ शकते.

युद्ध आणि परकीय आक्रमण - बाह्य आणीबाणी
सशस्त्र उठाव - अंतर्गत आणीबाणी.
घोषणा - पूर्ण देशासाठी, काही भागासाठी (४२वी घ.दु.१९७६)

* मंत्रिमंडळाकडून लिखित शिफारस आल्यानंतरच राष्ट्रपती राष्ट्रीय आणीबाणी घोषित करू शकतो (म्हणजे फक्त पंतप्रधानाच्या सल्ल्याने नव्हे तर मंत्रिमंडळाच्या) ⟹ ४४वी घ.दु. १९७८
* ३८वी घ.दु. १९७५ - आणीबाणीच्या घोषणेला न्यायालयीन पुनर्विलोकनापासून संरक्षण
  ४४वी घ.दु.१९७८ — ही तरतूद काढून टाकली.
* १९८० - मिनर्व्हा मिल केस : राष्ट्रीय आणीबाणीला न्यायालयात आव्हान देता येते.

## संसदेची मान्यता आणि कालावधी

⟹ राष्ट्रीय आणीबाणी घोषित केल्यापासून एका महिन्याच्या कालावधीत संसदेच्या दोन्ही गृहांनी तिला मान्यता दिली पाहिजे. (४४वी घ.दु.१९७८ - त्यापूर्वी कालावधी 2 महिने)
परंतु लोकसभा विसर्जित झाली असेल
घोषणेला मान्यता देण्याच्या एक महिन्याच्या कालावधी दरम्यान विसर्जित झाली असेल
घोषणेच्या मधल्या काळात राज्यसभेने मान्यता दिली असेल
तर पुनर्रचित लोकसभेच्या पहिल्या बैठकीपासून ३० दिवस लागू राहते.

→ दोन्ही गृहांनी मान्यता दिल्यास सहा महिन्यापर्यंत लागू राहते. दर सहा महिन्यांनी संसदेच्या मान्यतेने अनिश्चित काळापर्यंत वाढविली जाऊ शकते. (वेळोवेळी मान्यता देण्याची तरतूद ४४वी घ.दु.)

⟹ ठराव संसदेच्या विशेष बहुमताने (घ.दु. ४४वी) - त्यापूर्वी साध्या बहुमताने.

Scanned by CamScanner

## ④ घोषणा रद्द करणे

⇒ **राष्ट्रपती** आणीबाणीची घोषणा रद्द करू शकतो. (संसदेच्या संमतीची आवश्यकता नाही)

⇒ आणीबाणीचा ठराव लोकसभेने संमत केला नाही तर राष्ट्रपतीने आणिबाणी रद्द केली पाहिजे. (४४ वी घ.दु.) यापुर्वी लोकसभेचे नियंत्रण नव्हते.

⇒ लोकसभेच्या १/१० सदस्यांनी सभापतीला (अधिवेशन नसताना राष्ट्रपतीला) लिखित निवेदन दिल्यास घोषणा रद्द करण्याच्या ठरावावर विचारविनिमय करण्यासाठी गृहाची बैठक १४ दिवसात बोलवली पाहिजे (४४ वी घ.दु.)

आणीबाणीला मान्यता देणारा ठराव ⇒ लोकसभा व राज्यसभा ⟶ विशेष बहुमत

अमान्य करणारा ठराव ⇒ लोकसभा ⟶ साधे बहुमत

## ③ राष्ट्रीय आणिबाणीचे परिणाम

तीन प्रकारचे परिणाम. ① केंद्र राज्य संबंधावर

② लोकसभा व राज्य विधिमंडळाच्या कालावधीवर

③ मुलभुत हक्कावर

## * केंद्र राज्य संबंधावर

① **कार्यकारी**: * कार्यकारी अधिकारांचा वापर कसा करावा हे सांगण्याचा केंद्राला अधिकार मिळतो. सामान्य काळात काही विशिष्ट विषयाबाबतच आदेश देऊ शकतो. मात्र आणिबाणीच्या काळात कोणत्याही विषयावर

② **कायदेविषयक** * राज्यसूचीतील कोणत्याही विषयावर कायदे करण्याचा अधिकार केंद्राला (जरी राज्य सरकारे निलंबित केली नसली तरी)

असे कायदे आणीबाणीचा कालावधी संपल्यावर सहा महिन्यांनी लोप पावतात.

राष्ट्रीय आणिबाणीच्या काळात संसदेचे अधिवेशन चालू नसेल तर राष्ट्रपती राज्य विषयाबाबत अधिसूचना काढू शकतो.

४२वी घ.दु. नुसार हे कायदे ज्या राज्यात आणिबाणी लागू आहे त्याच बरोबर इतरही राज्यानाही लागू होतात.

③ **आर्थिक** - राष्ट्रपती केंद्र व राज्ये यांच्या महसुलातील विभागणीत बदल करू शकतो. म्हणजेच निधी कमी किंवा जास्त करू शकतो. हे बदल आणिबाणी संपल्यानंतर आर्थिक वर्ष संपेपर्यंत लागू राहतात. हे सर्व आदेश संसदेपुढे सादर करणे आवश्यक असते.

## * कालावधीवर परिणाम

① **कनिष्ठ गृहाच्या** - आणीबाणी काळात संसदेच्या कायद्याने लोकसभेचा ५ वर्षाचा कालावधी एका वेळी एका वर्षाने वाढवता येतो असे कितीही वेळा करता येते

परंतु आणीबाणी रद्द केल्यानंतर सहा महिन्यापेक्षा जास्त असत नाही.

उदा. पाचव्या लोकसभेचा (१९७१-७७) कार्यकाल एका वेळी एका वर्षाने असा २ वेळा वाढविला.

राज्य विधानसभेच्या बाबतीतही वरील नियम

## * मुलभूत हक्कावर परिणाम

हे परिणाम ३५८ व ३५९ मध्ये दिले आहेत.

**कलम ३५८ -** कलम १९ मधील मुलभूत हक्कांचे निलंबन — स्वतः आपोआप निलंबित

वेगळ्या आदेशाची आवश्यकता नसते.

या दरम्यान १९ मधील हक्क रद्द किंवा कमी करण्यासंदर्भात राज्य कायदा करु शकते

१९ चे उल्लंघन होते म्हणून न्यायालयात आव्हान देता येत नाही.

आणीबाणी संपल्यानंतर कलम १९ चे पुनरुज्जीवन

विसंगत कायदे आपोआप रद्द होतात (दरम्यान झालेल्या कृतींना नंतरही आव्हान देता येत नाही)

**यासंदर्भात ४४वी घटनादुरुस्ती बंधने**

① परकीय आक्रमण किंवा युद्ध या कारणासाठी आणीबाणी असेल तरच कलम १९ बाद

② जे कायदे आणीबाणीशी संबंधित नाहीत त्यांना न्यायालयात आव्हान देता येते. निलंबन काळात
आणीबाणी संबंधी केलेल्या कार्यकारी कृतींना संरक्षण.

**कलम ३५९** ⇒ कलम ३२ मधील हक्क निलंबित.

म्हणजेच हक्क निलंबित होत नाहीत पण अंमलबजावणी निलंबित होते.

राष्ट्रपतीच्या आदेशाने नमुद मुलभूत हक्कांची अंमलबजावणी निलंबित होते.

कालावधी - पूर्ण आणीबाणीच्या काळात किंवा आदेशात नमुद केल्याप्रमाणे कमी कालावधीसाठी

संपूर्ण देशात / काही भागासाठी

यासंबंधीचे विधेयक दोन्ही गृहांपुढे सादर करावा लागतो

दरम्यानच्या काळात मुलभूत हक्क कमी करण्यासंबंधीचे कायदे / न्यायालयात आव्हान देता येत नाही / कालावधी संपल्यावर अंमल संपतो / आदेश काळातील कृतींना कालावधी संपल्यावर आव्हान देता येत नाही.

**यासंदर्भात ४४वी घटनादुरुस्ती - बंधने**

कलम २० व २१ च्या हक्कांच्या अंमलबजावणीसाठी न्यायालयात जाण्याचा हक्क राष्ट्रपती निलंबित करु शकत नाही.

म्हणजे २० व २१ ची अंमलबजावणी आणीबाणी काळात करता येते

आणीबाणी संबंधी कायद्यांना - आव्हानापासून सूट

अशा कायद्या संबंधीत कार्यकारी कृतींना संरक्षण.

Scanned by CamScanner

कलम ३५८

① फक्त कलम १९ च्या हक्कांसंदर्भात
② आपोआप निलंबित
③ फक्त बाह्य आणीबाणी काळात
④ पूर्ण कालावधीसाठी निलंबित
⑤ संपूर्ण देशभर
⑥ १९ पूर्णतः निलंबित

कलम ३५९ -

सर्व हक्कांसंदर्भात
राष्ट्रपती आदेशाद्वारे
दोन्ही - बाह्य व अंतर्गत काळात
राष्ट्रपती निर्दिष्ट केलेल्या कालावधीसाठी
देशभर किंवा काही ~~भागा~~ भागासाठी
२०/२१ च्या अंमलबजावणीच्या निलंबनाचा अधिकार मिळत नाही.

## आतापर्यंत आणीबाणी

आतापर्यंत ३ वेळा राष्ट्रीय आणीबाणी - १९६२, १९७१, १९७५ मध्ये
① नेफा मध्ये चीनने केलेल्या आक्रमणाच्या वेळी - (१९६२) ⟶ जाने १९६८ पर्यंत.
( पं. नेहरु )
१९६५ मध्ये पाक युद्धावेळी पुन्हा घोषित करण्याची गरज नव्हती.

② पाकने केलेल्या आक्रमण केले तेव्हा (१९७१) ( इंदिरा गांधी )
③ ही आणीबाणी लागू असतानाच (१९७५) ⟶ अंतर्गत असतांना ( इंदिरा गांधी )
] मार्च १९७७ मध्ये उठविण्यात आल्या.

१९७५ मधील आणीबाणी घोषित करण्यामागील परिस्थिती ~~शोधन~~ चौकशी करण्यासाठी शाह आयोग

## ② राष्ट्रपती राजवट / राज्यातील / घटनात्मक आणीबाणी

कलम ३५५ ⟹ घटनेतील तरतुदीप्रमाणे राज्यातील सरकार काम करीत आहे हे सुनिश्चित करणे - केंद्र सरकारचे कर्तव्य.

कलम ३५६ ⟹ राज्याचा कारभार घटनेनुसार चालू नाही अशी खात्री झाल्यावर राष्ट्रपती घोषित करतात

कलम ३५६ अनुसार दोन कारणांसाठी
① एक कारण कलम ३५६ - घटनेनुसार राज्य सरकार काम करीत नाही.
② दुसरे कलम ३६५ - घटनेतील तरतुदी प्रमाणे राज्य सरकार काम करु शकत नाही.

Scanned by CamScanner

## संसदीय मान्यता व कालावधी

⇒ घोषणा केल्यापासून दोन महिन्यांच्या कालावधीत संसदेची मान्यता आवश्यक परंतु विसर्जनाच्या मुद्यावर नवीन लोकसभेच्या पहिल्या बैठकीपासून ३० दिवसांच्या कालावधी पर्यंत लागू राहते.

⇒ संसदेची मान्यता मिळाल्यास ६ महिन्यासाठी लागू.
दर सहा महिन्यांनी संसदेची मान्यता घेऊन कमाल ३ वर्षापर्यंत वाढवता येते.
(४२वा घ.दु. - सहा महिन्यावरुन कालावधी एक वर्ष
४४वा घ.दु. पुन्हा एक वर्षावरुन सहा महिने)

परंतु राष्ट्रपती राजवट पुढे चालू रहावी यासाठी मान्यता देण्यापूर्वी सहा महिन्यांच्या काळात लोकसभा विसर्जित झाली आणि मधल्या कालावधीत राज्यसभेने मान्यता दिली तर पुनर्रचित लोकसभेच्या पहिल्या बैठकीपासून ३० दिवसापर्यंत घोषणा लागू राहते.
राष्ट्रपतीराजवटीचा ठराव (घोषणा किंवा चालू ठेवणे) साध्या बहुमताने.

⇒ जरी कमाल कालावधी ३ वर्षांचा असला तरी खालील अटींची पूर्तता होत असेल तरच तो कालावधी एक वर्षापेक्षा अधिक काळ एका वेळी सहा महिन्यांनी वाढेल.

अटी. ① काही अडचणींमुळे संबंधित राज्यात विधान सभेच्या सार्वत्रिक निवडणुका घेता येत नाही असे निवडणूक आयोगाने प्रमाणित केले पाहिजे.
② संपूर्ण भारतात/संपूर्ण राज्यात किंवा राज्याच्या काही भागात राष्ट्रीय आणीबाणी लागू असली पाहिजे.

## राष्ट्रपती राजवटीचे परिणाम

राष्ट्रपतीला खालील खास अधिकार प्राप्त होतात.
① तो राज्य सरकारची कार्ये आणि राज्यपाल किंवा राज्यातील इतर कोणतेही अधिकारी यांचे अधिकार हाती घेऊ शकतो.
② संसदेद्वारे राज्य विधिमंडळाचे अधिकार वापरले जातील अशी घोषणा करू शकतो.

राजवट लागू झाल्यावर राष्ट्रपती मुख्यमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ बरखास्त करतो.
व राज्याचा मुख्य सचिव किंवा राष्ट्रपतीने नियुक्त केलेल्या सल्लागारांच्या साह्याने राज्यपाल राष्ट्रपतीच्या वतीने राज्याचे प्रशासन चालवतो.
राष्ट्रपती राज्य विधानसभा विसर्जित करतो किंवा निलंबित ठेवतो. - संसद राज्य विधानसभेची विधेयके व अर्थसंकल्प संमत करते. (नियमाप्रमाणे नव्याने निवडणुका होतात)
① लोकसभेचे अधिवेशन चालू असताना संसदेची मान्यता प्रलंबित ठेवून राष्ट्रपती राज्याच्या संचित निधीतून खर्चाला मान्यता देऊ शकतो.
② संसदेचे अधिवेशन चालू नसताना राष्ट्रपती राज्याच्या राज्यव्यवस्थेसाठी अधिसूचना जारी करू शकतो.

राष्ट्रपती संबंधित उच्च न्यायालयाचे अधिकार आपल्याकडे घेऊ शकत नाही किंवा त्यासंबंधी घटनात्मक तरतुदी निलंबित करू शकत नाही.
राष्ट्रपती राजवट काळात मूलभूत हक्कावर काहीही परिणाम होत नाही.
आ राष्ट्रपती राजवट उठविण्यासाठी संसदेच्या ठरावाची आवश्यकता नाही- राष्ट्रपतीला अधिकार

## कलम ३५६ चा वापर



* १९५० पासून १०० पेक्षा अधिक वेळा वापर
* सर्वात पहिल्यांदा १९५१ – पंजाब.
* १९७७ – जनता पक्षाचे सरकार – काँग्रेसप्रणित नऊ राज्यात राष्ट्रपती राजवट
  (उ.प्र, म.प्र, पंजाब, बिहार, हि.प्र, ओडिशा, प.बंगाल व हरियाणा)
* १९८० मध्ये काँग्रेसने – नऊ राज्यांत राष्ट्रपती राजवट
  (उ.प्र, बिहार, म.प्र, पंजाब, ओडीशा राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र, ता.नाडू)
* १९९२ मध्ये – धार्मिक संघटनांवरील बंदी बाबत – म.प्र, हि.प्र, राजस्थान भाजपप्रणीत राज्यात राजवट
  १९९४ – बोम्मई खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने वैध ठरवली.
* १९८८ – नागालँड, १९८९ – कर्नाटक, १९९१ – मेघालय – राजवट सर्वोच्च न्याया. अवैध ठरवली.
  २०१६ – उत्तराखंड – उत्तराखंड उच्च न्याया. अवैध ठरवली. – त्यावर सर्वोच्च न्याया. स्टे दिला.

## न्यायिक पुनर्विलोकनाची व्याप्ती

* ३८ वी घ.दु – १९७५ – न्यायालयात आव्हाण देता येणार नाही.
* ४४ वी घ.दु – १९७८ – वरील तरतूद रद्द – राष्ट्रपतींची खात्री पटणे हे न्यायीक पुनर्विलोकनाच्या कक्षेबाहेर नाही
* सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपती राजवटीसंदर्भात – बोम्मई खटल्यात खालील तत्वे मांडली.
  ① न्यायीक पुनर्विलोकन केले जाऊ शकते.
  ② दुष्ट हेतू किंवा विकृत पद्धतीने घोषणा केली असेल तर अवैध ठरू शकते.
  ③ या संदर्भात योग्य कारणे देण्याची जबाबदारी केंद्राची
  ④ न्यायालय घटना किंवा माहितीची सत्यता पडताळून पाहू शकत नाही परंतु ती कृतीशी संबंधीत आहे किंवा नाही हे बघू शकते.
  ⑤ घोषणा अवैध ठरली तर बरखास्त केलेले राज्यसरकार पुनः स्थापित करण्याचा, विसर्जित किंवा निलंबित केलेली राज्यविधान सभा पुनर्जीवित करण्याचा न्यायालयाला अधिकार आहे.
  ⑥ संसदेने मान्यता दिल्यानंतरच विधानसभा विसर्जित करावी तोपर्यंत फक्त निलंबित करावी.
  ⑦ धर्मनिरपेक्षते विरुद्ध धोरणे राबविणाऱ्या राज्य सरकारविरुद्ध ३५६ नुसार कृती करता येते.

याच खटल्यात राजवट लागू करण्यासाठीची सांगितलेली मार्गदर्शक तत्वे.

① राज्यात त्रिशंकू परिस्थिती.
② बहुमतात आलेला पक्ष सरकार स्थापन करण्यास नकार देतो – कोणतीही युती नसते–
③ केंद्राच्या घटनात्मक आदेशांचे पालन केले नसेल.
④ अंतर्गत विध्वंसक कृती – जेव्हा सरकार जाणीवपूर्वक घटनाबाह्य कृती करीत असेल.

खालील परिस्थितीत रा.रा लागू करणे अयोग्य ठरेल

① मंत्रिमंडळाच्या अस्तानंतर → पर्यायी मंत्रिमंडळाची शक्यता पडताळून न पाहता रा.रा.लागू करणे
② मंत्रिमंडळाला गृहामध्ये बहुमत सिद्ध करण्याची संधी न देणे.
③ जेव्हा विधानसभेत बहुमत असलेल्या पक्षाचा लोकसभेत दारुण पराभव होतो.

Scanned by CamScanner

122

④ विघातक स्वरूपाची नसलेली अंतर्गत अशांतता.

⑤ राज्यातील कुप्रशासन, मंत्रिमंडळावर भ्रष्टाचाराचे आरोप किंवा गंभीर आर्थिक परिस्थिती

## आर्थिक आणिबाणी

भारताची किंवा त्याच्या कोणत्याही भागाची पत किंवा आर्थिक स्थैर्य धोक्यात आले आहे अशी जर राष्ट्रपतींची खात्री पटली - तर कलम ३६० नुसार राष्ट्रपती आर्थिक आणिबाणी घोषित करू शकतो.

३८ वी घ.दु. - १९७५ } → न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या कक्षेबाहेर

४४ वी घ.दु. - १९७८ } → ——— " ——— कक्षेत.

## संसदेची मान्यता आणि कालावधी

आणिबाणी लागू केल्यानंतर दोन महिन्यांच्या कालावधीत संसदेच्या दोन्ही गृहांची मान्यता

विसर्जनाच्या परिस्थितीत ३० दिवसांपर्यंत.

अनिश्चित कालावधी साठी लागू असते.

① कमाल कालावधी सांगितलेला नाही.

② वेळोवेळी संसदेची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही.

* घोषणेचा ठराव ———→ संसदेच्या साध्या बहुमताने

* रद्द करण्याचा ठराव ———→ मान्यता आवश्यक नाही — राष्ट्रपती घोषित करेल.

## आर्थिक आणिबाणीचे परिणाम

आर्थिक उपाययोजना → ① राज्यात कार्यरत सर्व किंवा काही वर्गातील कार्यरत सेवकांच्या भत्त्यात/वेतनात कपात

② राज्य विधिमंडळाने संमत केलेली सर्व अर्थविधेयके किंवा इतर वित्तीय विधेयके राष्ट्रपतीच्या विचारार्थ राखून ठेवणे.

③ सर्वोच्च/उच्च न्याया. न्यायाधीशांच्या वेतन/भत्त्यात कपात.

राज्याच्या सर्व आर्थिक बाबी केंद्राच्या नियंत्रणाखाली —

* "आर्थिक आणीबाणीच्या तरतुदी म्हणजे राज्यांच्या आर्थिक स्वायत्ततेला धोका" - एच.एन. कुंझरू

* १९३३ मध्ये अमेरिकेतील नॅशनल रिकव्हरी ॲक्ट अन्वये राष्ट्राध्यक्षांना जे अधिकार दिले त्याच्याशी साधर्म्य ———→ डॉ आंबेडकर

* आणीबाणी विषयक अधिकारामुळे एकाधिकारशाही/पोलीसी राज्य निर्माण होईल → एच.व्ही.कामत

* प्रतिगामी व ऱ्हास करणारे प्रकरण - के.टी.शाह

* राष्ट्रपतींची घटनात्मक हुकुमशाही निर्माण होईल — टी.टी.कृष्णमाचारी.

Scanned by CamScanner